कृपया प्रसिद्धीसाठी

दि. २७ ऑगस्ट २०१७

# ‘समाजस्वास्थ्य’ नाटकाचे पुणे फेस्टिव्हलमध्ये सादरीकरण

सन १९३० ते १९५० या कालावधीत ज्येष्ठ समाजसुधारक र. धों. कर्वे यांनी त्यांच्या ‘समाजस्वास्थ्य’ मासिकातून शिक्षण, आरोग्य, आणि लैंगिक शिक्षण या विषयांवर सातत्याने प्रबोधन केले. त्यांच्या क्रांतिकारी विचारांविरुद्ध सनातन मंडळींनी त्यांच्याविरुद्ध तीस खटले दाखल केले. त्यातील एका खटल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी र. धों. कर्वे यांची जोरदारपणे बाजू मांडली. या संघर्षमय कालावधीचे वास्तववादी सादरीकरण करणारे ‘समाजस्वास्थ्य’ हे दोन अंकी नाटक पुणे फेस्टिव्हलमध्ये यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आज सादर करण्यात आले. त्यांस प्रेक्षकांनी मोठा प्रतिसाद दिला.

या नाटकाचे लेखन अजित दळवी यांनी केले असून दिग्दर्शन अतुल पेठे यांनी केले आहे. यामध्ये र. धों. कर्वे यांची भूमिका अतुल पेठे यांनी समर्थपणे केली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका अजित साबळे यांनी समर्थपणे वठवली आहे. मामा वरेरकरांच्या भूमिकेत अभय जबडे असून मालतीबाईंच्या भूमिकेत राजश्री सावंत वाड यांनी उत्तम व्यतिरेखा वठवली. प्रकाश योजना प्रदीप वैद्य, नेपथ्य प्रदीप मुळे, वेषभूषा माधुरी पुरंदरे, संगीत नरेंद्र भिडे यांचे होते. या नाटकाचा हा ३७ वा प्रयोग असून चंडीगढ संगीत नाटक अकादमीच्या राष्ट्रीय नाटक महोत्सवासाठी ‘समाजस्वास्थ्य’ नाटकाची निवड झाली आहे. तेथेही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभेल असे दिग्दर्शक अतुल पेठे यांनी सांगितले. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलतर्फे अतुल गोंजारी यांनी स्वागत केले, पुणे फेस्टिव्हलचे मराठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे संयोजक मोहन टिल्लू यांनी कलाकारांचे सत्कार केले. अतुल काते यांनी आभार प्रदर्शन केले.

कळावे.

आपला स्नेहांकित

प्रवीण प्र. वाळिंबे
माध्यम समन्वयक
९८२२४५४२३४